# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७

तार EDUTECE-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in


क्रमांक:१५/तंशिसं/अर्थस/ईबीसी/ऑनलाईन/२०१४-१५/२३

दिनांक : 14 MAY 2015

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/

अमरावती/नागपूर.

विषय :- खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया विदयार्थ्याच्या शैक्षणिक शुल्कांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत . . . प्रवेशीत

(मराठा/मुस्लीम प्रवर्गातील आरक्षणातून/ तसेच यापूर्वी अर्ज न भरु शकलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाबाबत)

(संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे)

मराठा व मूस्लीम ह्या समाजातील विद्यार्थ्यांचा समावेश सामाजिक न्याय व आदिवासी विकास ह्या विभागातर्फे २०१४-१५ ह्या शैक्षणिक वर्षाच्या फी प्रतिपूर्ती योजने अंतर्गत निर्गमित झालेल्या शासन धोरणात समावेश करण्यांत आलेला नाही. त्यामूळे सदर प्रवर्गातील प्रात्र विद्यार्थ्यांचा उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि. २० मार्च २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे मान्य केलेल्या धोरणाअंतर्गत फी प्रतिपूर्ती योजने अंतर्गत समावेश करणे आवश्यक आहे.

खाजगी विना-अनुदानित व कायम विना-अनुदानित संस्थामधील ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क हे **"शिक्षण शुल्क समितीद्वारे"** ठरविण्यांत येते अशा संस्थामधील केन्द्रिय प्रवेश प्रक्रियेद्वारे शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या मराठा/मुस्लीम समाजातील विद्यार्थी तसेच यापूर्वी अर्ज भरु न शकलेल्या अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कमेची प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी **(ऑनलाईन) संगणकीय प्रणालीवर दिनांक १५ मे २०१५ ते दिनाक २५ मे २०१५ पर्यंत अर्ज भरण्यासाठी लिंक देण्यात येत आहे.**

विद्यार्थ्यांनी दिनांक २५ मे २०१५ पर्यंत संगणकीय प्रणालीवर भरलेल्या अर्जाची प्रत प्रमाणित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह (विद्यार्थ्यांनी यापूर्वी कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्काचे

लाभ घेतला नाही असे स्वयं घोषणापत्र सादर करणे अनिवार्य राहील तसेच इतर योजनेमधून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासन जमा करण्यासंबंधीसुध्दा घोषणापत्रामध्ये नमूद करावे.) संबंधीत संस्थेनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज छाननी करुन अर्ज दिनांक ३० मे २०१५ पर्यंत संबंधीत विभागीय कार्यालयास सादर करावेत. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी प्राप्त अर्जांची छाननी करुन अहवाल या कार्यालयास दि. ५ जून २०१५ पर्यंत सादर करावा.

( दयानंद मेश्राम )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिष्य/[illegible]/ २९२५
दिनांक :- 15 MAY 2015

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद अधिनस्त प्राचार्य, पदविका, पदवी, पदव्युत्तर संस्था, यांना माहितीस्तव व अनुपालनास्तव.

सह संचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.

या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना सुचित करण्यात येते की, सदर पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करावे.